**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना**
राबविण्यासाठी अवलंबवावयाची **कार्यपध्दती व**
मार्गदर्शक **सुचना**

# परिपत्रक

**जा. क्र :** कृषि/मासु/गोमुशेसाअयो/सां.९/१६५६६ /२०२३, दिनांक :- १७ /०५ /२०२३
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१
संदर्भ : शासन निर्णय क्रमांक शेअवि-**२०२०/प्र.क्र.३३०/११अे**, दि.१९ एप्रिल, **२०२३**

प्रस्तावना :-

राज्यात **शेती** व्यवसाय करतांना होणारे अपघात, **विज पडणे, पूर,** सर्पदंश, विंचूदंश, विजेचा **शॉक** बसणे इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे **होणारे अपघात,** रस्त्यावरील **अपघात, वाहन अपघात, तसेच अन्य** कोणत्याही कारणामुळे **होणारे अपघात** यामुळे **बऱ्याच** शेतकऱ्यांचा **मृत्यू** ओढवितो **किंवा अपंगत्व येते.** घरातील **कर्त्या** व्यक्तिस झालेल्या अपघातामुळे कुंटूंबाचे उत्पनाचे **साधन बंद होऊन** अडचणीची परिस्थिती **निर्माण होते. अशा** अपघातग्रस्त शेतकऱ्यास / **त्याच्या** कुटुंबास **आर्थिक लाभ** देण्याकरिता कोणतीही **स्वतंत्र** विमायोजना नसल्यामुळे **शासनाने सन २००५-०६** पासून **अशा** अपघातग्रस्त शेतकऱ्यांसाठी **विमा** योजना कार्यान्वित केली.

**सन २००५-०६** पासून **ते सन २००८-०९** पर्यत सदर योजना शेतकरी व्यक्तिगत अपघात विमा योजना **या** नावाने कार्यान्वित **होती. सन २००९-१०** पासून **सदर** योजनेचे नामाभिधान शेतकरी **जनता** अपघात **विमा** योजना **असे** करण्यात आले. **सन २०१५-१६** पासून **सदर** योजना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना **या** नावाने कार्यान्वित **आहे. परंतु** आजपर्यत **सदर विमा योजना हि विमा** कंपनी **व विमा** सल्लागार कंपनीमार्फत राबविण्यात **येत होती. विमा** कंपन्याकडून **प्रस्ताव** अनावश्यक कारणास्तव नाकारणे, **वेळेत दावे** मंजुर **न करणे,** इत्यादी कारणास्तव अपघातग्रस्त शेतकरी / शेतकरी **कुटुंब आर्थिक लाभापासून वंचीत राहत होते.** याअनुषंगाने प्रचलित **गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेमध्ये सुधारणा करुन** “गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना” राबविण्याबाबत **दि. १७/३/२०२३ रोजी मा.** मंत्रीमंडळाच्या **बैठकीमध्ये** मान्यता देण्यात आलेली आहे.

गोपीनाथ **मुंडे** शेतकरी **अपघात सुरक्षा सानुग्रह** अनुदान योजनेंतर्गत शेतकरी कुंटुंबास **आर्थिक लाभ** देण्याकरिता **राज्यातील सर्व** वहितीधारक **खातेदार शेतकरी व** शेतकऱ्याच्या कुटुंबातील वहितीधारक **खातेदार** म्हणून **नोंद** नसलेले कोणताही **एक सदस्य (आई-**वडिल, शेतकऱ्याची **पती-पत्नी,** मुलगा **व** अविवाहित मुलगी, यापैकी कोणतीही **एक** व्यक्ती) **असे १० ते ७५** वयोगटातील एकूण २ जणांना योजनेचा **लाभ** देण्यास **संदर्भाधिन शासन** निर्णयान्वये **मान्यता देण्यात आलेली असून** योजनेसंदर्भात **यापूर्वी निर्गमित करणेत आलेले शासन** निर्णय/परिपत्रके अधिक्रमित करण्यात **आले आहेत. सबब, सुधारीत** स्वरुपातील गोपीनाथ मुंडे शेतकरी **अपघात** सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना **सन २०२३-२४ मध्ये** राबविण्यासाठी **दि. २३** ऑगस्ट, **२०२२ ते दि. १८** एप्रिल, **२०२३ या कालावधीत प्राप्त** झालेल्या प्रस्तावांचे प्रायोगिक तत्वानुसार **या** मार्गदर्शक सुचनेनुसार **प्रस्ताव मंजुर**

करण्याबाबतची कार्यवाही तालुका स्तरीय समितीने करण्यात यावी. तसेच दि. १९ एप्रिल, २०२३ ते दि. ३१ मार्च, २०२४ पर्यत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांकरीताही या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**शासन परिपत्रक -:**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेचे कल्याणकारी स्वरूप विचारात घेऊन ही योजना सुधारीत स्वरुपात राबविण्यासाठी योजनेच्या कार्यवाहीबाबत पुढील प्रमाणे कार्यपध्दती व मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहे.

१) राज्यातील सर्व वहितीधारक खातेदार शेतकरी व शेतकऱ्यांचे कुंटुंबातील वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले कोणताही एक सदस्य (आई-वडिल, शेतकऱ्याची पती-पत्नी, मुलगा व अविवाहित मुलगी, यापैकी कोणतीही एक व्यक्ती) असे १० ते ७५ वयोगटातील एकूण २ जणांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबविण्यास संदर्भाधिन शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

२) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेसाठी लाभ प्रदान करण्यासाठी कुटुंबाच्या व्याख्येमध्ये शेतकऱ्याचे (आई-वडिल, शेतकऱ्याची पती-पत्नी, मुलगा व अविवाहित मुलगी, यापैकी कोणतीही एक व्यक्ती) यांचा समावेश ग्राह्य धरण्यात यावा.

३) **योजनेंतर्गत देय लाभ :-** सदर योजनेअंतर्गत अपघात ग्रस्त शेतकऱ्यांना /त्यांच्या कुटुंबियांस प्रकरणपरत्वे खालील प्रमाणे लाभ अनुज्ञेय राहील.

| अ.क्र. | अपघाताची बाब | नुकसान भरपाई |
|---|---|---|
| १ | अपघाती मृत्यू | रु.२,००,०००/- |
| २ | अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन हात किंवा दोन पाय तसेच एक डोळा व एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास | रु.२,००,०००/- |
| ३ | अपघातामुळे एक डोळा अथवा एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास | रु.१,००,०००/- |

४) सदर योजना कालावधीत संपुर्ण दिवसासाठी म्हणजेच विहित कालावधीतील प्रत्येक दिवसाच्या २४ तासांसाठी हि योजना लागू राहिल. या कालावधीत वहितीधारक खातेदार शेतकरी व शेतकऱ्यांचे कुटुंबातील वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले कोणताही एक सदस्य यापैकी कोणत्याही व्यक्तिला केव्हांही अपघात झाला किंवा अपंगत्व आले तरीही ते योजनेअंतर्गत लाभासाठी पात्र राहतील.

५) सदर योजने अंतर्गत लाभास पात्र असलेल्या शेतकऱ्याने / शेतकऱ्याच्या कोणत्याही वारसदाराने शासनाच्या अन्य विभागांकडून अपघातग्रस्तांसाठी कार्यान्वित असलेल्या योजनेचा लाभ घेतला असल्यास सदर लाभार्थी या योजनेअंतर्गत लाभास पात्र ठरणार नाहीत.

६) **योजना कार्यान्वयीन यंत्रणा :** गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजने अंतर्गत शेतकरी/वारसदारास तातडीने मदत मिळणेसाठी तहसीलदार यांचे अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती स्थापन करुन जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी याचे अध्यक्षतेखाली जिल्हा अपिलिय समिती गठीत करण्यात आली आहे.

७)	लाभार्थी पात्रता :-

महाराष्ट्र राज्यातील १० ते ७५ वयोगटातील महसूल नोंदी नुसार खातेदार असलेला शेतकरी व वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेला उक्त मुददा क्र. २ अन्वये शेतकऱ्याच्या कुटुंबातील कोणताही १ सदस्य.

८)	**वारसदार : - अपघातग्रस्ताचे निधन झाल्यास त्यांच्या कुंटुंबातील वारसदाराची निवड व सानुग्रह अनुदानाची रक्कम पुढील प्राथम्य क्रमानुसार अदा करावी.**

१) अपघातग्रस्त यांची पत्नी/अपघातग्रस्त स्त्रीचा पती २) अपघातग्रस्ताची अविवाहित मुलगी ३) अपघातग्रस्ताची आई ४) अपघातग्रस्ताचा मुलगा ५) अपघातग्रस्ताचे वडिल ६) अपघातग्रस्ताची सुन ७) अन्य कायदेशीर वारसदार

९)	योजनेमध्ये समाविष्ठ असलेल्या बाबी :-

१) रस्ता / रेल्वे अपघात, २) पाण्यात बुडुन मृत्यू, ३) जंतुनाशके हताळताना अथवा अन्य कारणाने विषबाधा, ४) विजेचा धक्का बसल्याने झालेला अपघात, ५) विज पडून मृत्यू, ६) खुन, ७) उंचावरुन पडून झालेला अपघात, ८) सर्पदंश व विंचुदंश, ९) नक्षलाईट कडून झालेल्या हत्या, १०) जनावरांच्या खाल्यामुळे / चावल्यामुळे जखमी / मृत्यू, ११) बाळंतपणातील मृत्यू १२) दंगल १३) अन्य कोणताही अपघात

१०)	योजनेमध्ये समाविष्ठ नसलेल्या बाबी :-

१) नैसर्गिक मृत्यू, २) विमा कालावधी पुर्वीचे अपंगत्व ३) आत्महत्येचा प्रयत्न, आत्महत्या किंवा जाणीवपुर्वक स्वत:ला जखमी करुन घेणे, ४) गुन्ह्याच्या उद्देशाने कायद्याचे उल्लंघन करताना झालेला अपघात ५) अमंली पदार्थाच्या अमंलाखाली असताना झालेला अपघात, ६) भ्रमिष्ठपणा ७) शरिराअंतर्गत रक्तस्त्राव ८) मोटार शर्यतीतील अपघात ९) युध्द, १०) सैन्यातील नोकरी, ११) जवळच्या लाभधारकांकडून खुन.

११)	आवश्यक कागदपत्रे

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजने अंतर्गत लाभ प्राप्त होणेसाठी **प्रस्तावासोबत (क्लेम फॉर्म, भाग-१)** खालील कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१) ७/१२ उतारा
२) मृत्यूचा दाखला
३) शेतकऱ्यांचे वारस म्हणून गावकामगार तलाठ्याकडील गांव नमुना नं. ६ क नुसार मंजूर झालेली वारसाची नोंद.
४) वारसदाराचे ओळखपत्र : आधारकार्ड/ पॅनकार्ड /बँक पासबुक/निवडणुक ओळखपत्र
५) अपघातग्रस्ताचा वयाचा दाखला :- जन्म दाखला /शाळा सोडल्याचा दाखला/शाळेच्या मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र / ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र /आधार कार्ड/पॅन कार्ड/वाहन चालविण्याचा परवाना / पारपत्र / निवडणूक ओळखपत्र यापैकी कोणतेही एक कागदपत्र
६) प्रथम माहिती अहवाल / घटनास्थळ पंचनामा / पोलिसपाटील माहिती अहवाल
७) अपघाताच्या स्वरुपानुसार अंतिम प्रस्तावासोबत सादर करावयाचे कागदपत्र (पपत्र-अ)

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना (प्रपत्र -अ)

| अ.क्र. | अपघाताचे स्वरुप | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|
| १ | रस्ता / रेल्वे अपघात | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल, विमा संरक्षित व्यक्ती वाहन चालविताना अपघात झाल्यास त्याचा वैध मोटार वाहन परवाना. |
| २ | पाण्यामध्ये बुडून मृत्यू | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल,बुडून बेपत्ता झाल्यास फक्त प्रथम माहिती अहवाल व क्षतीपूर्ती बंधपत्र आवश्यक) |
| ३ | जंतूनाशक अथवा अन्य कारणामुळे विषबाधा | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल, रासायनिक विश्लेषण अहवाल (व्हिसेरा अहवाल) |
| ४ | विजेचा धक्का अपघात | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल |
| ५ | वीज पडून मृत्यू | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल |
| ६ | खून | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल, रासायनिक विश्लेषण अहवाल (व्हिसेरा अहवाल), दोषारोप पत्र |
| ७ | उंचावरुन पडून झालेला मृत्यू | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल, पोलीस अंतिम अहवाल |
| ८ | सर्पदंश/विंचू दंश | पोस्ट मॉर्टेम अहवाल, वैद्यकीय उपचारा पूर्वीच निधन झाल्याने पोस्ट मॉर्टेम झाले नसल्यास या अहवालातून सूट मात्र वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र शासकीय आरोग्य केंद्र अधिका-याकडून प्रतिस्वाक्षरीत असणे आवश्यक |
| ९ | नक्षलवाद्याकडून झालेल्या हत्या | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल,नक्षलवादी हत्येसंदर्भातील कार्यालयीन कागदपत्र |
| १० | जनावरांच्या हल्ल्यामुळे / चावण्यामुळे जखमी / मृत्यू | |
| | अ) जनावरांच्या चावण्यामुळे रेबीज होऊन मृत्यू | औषधोपचाराची कागदपत्रे |
| | ब) जखमी होऊन मृत्यू | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल |
| | क) जनावरांच्या हल्ल्यात मृत्यू होऊन शव न मिळणे | क्षतिपूर्ती बंधपत्र आवश्यक |
| ११ | दंगल | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल, दंगलीबाबतची कार्यालयीन कागदपत्रे |
| १२ | अन्य कोणतेही अपघात | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्ट मॉर्टेम अहवाल, पोलीस अंतिम अहवाल |
| १३ | अपंगत्वाच्या लाभाच्या पुराव्यासाठी सादर करावयाची कागदपत्रे | १) अपंगत्व अथवा अवयव निकामी होण्याचे कारणाबाबतचे डॉक्टरांचे अंतिम प्रमाणपत्र अथवा दवाखान्याच्या नोंदी. कायम अपंगत्व किमान ४० टक्के आवश्यक.<br>२) प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र/जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रतिस्वाक्षरीसह कायम अंपगत्वाचे प्रमाणपत्र. |

सुचना :-१) वरील कागदपत्र मूळ किंवा राजपत्रित अधिकारी यांनी सांक्षाकीत केलेले अथवा स्वयंसाक्षांकित असल्यास ग्राहय धरण्यात येईल. २) मृत्यूच्या कारणाची नोंद सक्षम प्राधिकाऱ्याने स्पष्ट केली असल्यास रासायनिक विश्लेषण अहवाल (व्हिसेरा अहवाल) या कागदपत्राची आवश्यकता राहणार नाही.

११.१ जेव्हा शेतकऱ्याचे अपघाताचे प्रकरण निदर्शनास येईल तेव्हा संबंधित अपघातग्रस्त शेतकरी / शेतकऱ्यांचे वारसदार यांनी सर्व निर्धारीत कागदपत्रांसह परिपुर्ण प्रस्ताव संबंधित तालुका कृषि अधिकारी यांचेकडे ३०

दिवसाच्या **आत सादर करावा.** यासाठी कृषि **विभागाच्या सर्व क्षेत्रिय** अधिकारी / कर्मचारी संबंधिताना मार्गदर्शन करतील.

**११.२** अपघातग्रस्त शेतकऱ्याबाबत **प्राथमिक** माहिती **प्राप्त** झाल्यानंतर सखोल चौकशी करण्यासाठी संबंधित महसूल अधिकारी, पोलिस अधिकारी, तालुका कृषि अधिकारी **यांचे पथकाने प्रत्यक्ष भेट देऊन** तपासणी **करुन** त्याबाबतचा **अहवाल** तहसीलदार **यांना घटना** झाल्यापासून ८ दिवसाच्या **आत सादर करावा.**

**११.३** तालुका कृषि अधिकारी **यांनी प्राप्त** झालेल्या प्रस्तावांची योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार **छाननी करुन मंजुर प्रस्ताव,** नामंजुर **प्रस्ताव** कारणासहित **व** कागदपत्रांअभावी अपुर्ण **प्रस्ताव या** वर्गवारीनुसार **संबंधित** तहसिलदार यांचेकडे **सादर** करतील **व मुळ** प्रस्तांवांचे **जतन तालुका** कृषि अधिकारी स्तरावरच **करण्यात येईल.**

**११.४** तहसिलदार **यांचे अध्यक्षेतेखालील** समितीच्या **बैठकीमध्ये ३०** दिवसाच्या **आत** संबंधित शेतकरी / शेतकरी कुंटूंबाच्या वारसदारांना **लाभ** देण्याबाबतचा **निर्णय घेण्यात येवून संबंधित तालुका कृषि अधिकारी** यांचेमार्फत **संबंधित** अपघातग्रस्त शेतकरी / वारसदारांच्या **बँक** खात्यात **ECS व्दारे निधी अदा** करण्यात येईल.

**१२) योजना** अंमलबजावणीची कार्यपध्दती :

**१२.१ सदर** योजनेअंतर्गत **लाभ** घेण्यासाठी संबंधित अपघातग्रस्त शेतकरी / शेतकऱ्यांचे वारसदार **हे** संबंधित **तालुका** कृषि अधिकारी यांचेकडे सविस्तर **प्रस्ताव आवश्यक** कागदपत्रांसह **विहित** नमुन्यातील **क्लेम फॉर्म भाग- १ नुसार अपघात** झालेपासून ३० दिवसाच्या **आत सादर** करतील.

**१२.२** तालुका कृषि अधिकारी कार्यालय **यांनी प्राप्त** प्रस्तावाची मार्गदर्शक सुचनेप्रमाणे **व शासन** निर्णयानुसार **छाननी करुन मंजुर** प्रस्ताव, नामंजुर **प्रस्ताव** कारणासहित **व** कागदपत्रांअभावी अपुर्ण **प्रस्ताव या** वर्गवारीनुसार **संबंधित** तहसिलदार यांचेकडे **सादर करतील.**

**१२.३** तहसिलदार **त्यांचे अध्यक्षेतेखालील** तालुका **स्तरीय** समितीच्या **बैठकीमध्ये ३०** दिवसाच्या **आत** संबंधित शेतकरी / शेतकरी कुंटूंबाच्या वारसदारांना **लाभ** देण्याबाबतचा **निर्णय घेतील.**

**१२.४** संबंधित तालुका **कृषि** अधिकारी **हे** तालुका स्तरीय समितीने **मंजुर** केलेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने **ला**भार्थीनिहाय अनुदानाची **मागणी उपविभागीय कृषि अधिकारी** यांचेमार्फत **संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि** अधिकारी यांचेकडे करतील.

**१२.५** संबंधित जिल्हयाचे जिल्हा **अधिक्षक** कृषि अधिकारी **यानी** जिल्हयाची **लाभार्थी**निहाय एकत्रित **निधीची मागणी कृषि** आयुक्तालयाकडे **करावी.**

**१२.६** कृषि आयुक्तालयाने राज्यासाठी **लाभार्थी**निहाय एकत्रित **निधी मागणी** शासनाकडे **सादर करावी.**

**१२.७** शासनाने तालुका स्तरीय समितीने मंजुर केलेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने **पात्र लाभार्थ्यासाठी उपलब्ध करुन** दिलेला **निधी कृषि** आयुक्तालय स्तरावरुन **संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि** अधिकारी **यांचे** मार्फत **तालुका कृषि** अधिकारी कार्यालयास **BDS** प्रणालीव्दरे **वितरीत केला जाईल** तद्नंतर **तालुका कृषि** अधिकारी यांचेमार्फत **संबंधित** अपघातग्रस्त शेतकरी / वारसदारांच्या **बँक** खात्यात **ECS व्दारे निधी अदा** करण्यात येईल.

**१३) योजना अंमलबजावणीच्या दृष्टीने इतर महत्वाच्या सुचना :-**

१. कृषि पर्यवेक्षक, **मंडळ** कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी **व उपविभागीय** कृषि अधिकारी यांच्यासाठी **विभागीय कृषि** सहसंचालक **व जिल्हा अधिक्षक कृषि** अधिकारी **यांचे** सहकार्याने **जिल्हा स्तरावर** एकदिवसीय प्रशिक्षण **वर्ग** आयोजीत **करावा व यामध्ये** योजनेच्या मार्गदर्शक **सुचना,** योजना राबविण्याची **कार्यपध्दती, लाभार्थ्यां- कडून प्राप्त** करावयाचा **अर्ज व** आवश्यक कागदपत्रे, **प्रत्येक** स्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांचेडील **कर्तव्य व** जबाबदाऱ्या याबाबतीत सविस्तर माहिती **द्यावी.**

२.	सदर योजनेबाबत तालुकास्तर, जिल्हास्तर व विभागीय स्तरावरुन व्यापक स्वरुपात प्रचार व प्रसिध्दी करण्यात यावी.

३.	अपघातग्रस्त वाहन चालकाच्या चुकीमुळे शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्यास /अपंगत्व आल्यास दोषी वाहन चालक वगळता, सर्व अपघातग्रस्त शेतकऱ्यांचे, केवळ अपघात झाला या कारणास्तव, प्रस्ताव मंजूर करावेत.

४.	अपघाती मृत्यू संदर्भात दुर्घटना घडल्याचे सिद्ध झाल्यास "अनावश्यक धोका पत्करला" या कारणास्तव एकही प्रस्ताव नाकारता येणार नाही.

५.	वाहन अपघातात वाहनचालक भरधाव वेगाने किंवा निष्काळजीपणाने गाडी चालवत होता या कारणास्तव प्रस्ताव नाकारता येणार नाही.

६.	जर शेतकऱ्याचा मृत्यू वाहन अपघातामुळे झाला असेल व अपघात ग्रस्त शेतकरी स्वत: वाहन चालवत असेल तर अशा प्रकरणी वाहन चालवण्याचा वैध परवाना सादर करणे आवश्यक राहील.

७.	अपघातग्रस्ताचे निधन झाल्यास त्यांच्या कुंटुंबियांस सानुग्रह अनुदानाची रक्कम पुढील प्राथम्य क्रमानुसार अदा करावी.

१) अपघातग्रस्त यांची पत्नी/अपघातग्रस्त स्त्रीचा पती २) अपघातग्रस्ताची अविवाहित मुलगी ३) अपघातग्रस्ताची आई ४) अपघातग्रस्ताचा मुलगा ५) अपघातग्रस्ताचे वडिल ६) अपघातग्रस्ताची सुन ७) अन्य कायदेशीर वारसदार

८.	सदर योजनेच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या माहिती अधिकार कायद्यांर्तगत प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी जन माहिती अधिकाऱ्यांची तसेच अपीलीय अधिकारी यांची नेमणुक करणे बंधनकाराक आहे.

**१४)	योजनेचे संनियंत्रण करणेसाठी विविध स्तरावरिल गठीत समित्या.**

(सदर योजनेच्या सनियंत्रणासाठी विविध स्तरावर खालीलप्रमाणे समित्या स्थापन करण्यात येत आहेत त्या समितींची रचना व कार्यपध्दती पुढीलप्रमाणे असतील.)

**१५.१) राज्यस्तरीय समिती**

प्रधान सचिव (कृषि) यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात येऊन त्याची रचना खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) अ.मु.स/प्रधान सचिव /सचिव (कृषि) | : | अध्यक्ष |
| २) अ.मु.स/प्रधान सचिव /सचिव (महसूल) | : | सदस्य |
| ३) ) अ.मु.स/प्रधान सचिव /सचिव (मदत व पुर्नवसन) | : | सदस्य |
| ४) अ.मु.स/प्रधान सचिव /सचिव (नियोजन) | : | सदस्य |
| ५) अ.मु.स/प्रधान सचिव /सचिव (गृह) | : | सदस्य |
| ६) अ.मु.स/प्रधान सचिव /सचिव (वित्त) | : | सदस्य |
| ७) अ.मु.स/प्रधान सचिव /सचिव (आरोग्य) | : | सदस्य |
| ८) आयुक्त (कृषि) | : | सदस्य |
| ९) उपसचिव (कृषि) | : | सदस्य सचिव |

राज्यस्तरीय समितीची कार्ये:

१. योजनेच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवणे.

२. योजनेच्या अंमलबजावणीवेळी येणाऱ्या विविध अडचणीच्या संदर्भात विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

३. योजनेच्या अंमलबजावणीबाबत सहामाही आढावा घेणे.

१५.२) जिल्हास्तरीय जिल्हा अपिलीय समिती :

योजनेच्या प्रभावी संनियंत्रणासाठी संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुढील प्रमाणे जिल्हा अपिलीय समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हाधिकारी | : | अध्यक्ष तथा अपिलिय अधिकारी |
| २) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | : | सदस्य |
| ३) अतिरिक्त पोलीस अधिक्षक | : | सदस्य |
| ४) जिल्हा शल्य चिकित्सक | : | सदस्य |
| ४) जिल्हा आरोग्य अधिकारी | : | सदस्य |
| ५) सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी | : | सदस्य |
| ६) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | : | सदस्य सचिव |

जिल्हास्तरीय अपिलीय समितीची कार्ये:

१) तालुका स्तरीय समितीने घेतलेला निर्णय शेतकऱ्यास / वारसदारास मान्य नसल्यास या संदर्भात समाधानकारक तोडगा काढणे.
२) समितीची त्रैमासिक बैठक घेण्यात यावी व त्यामध्ये जिल्ह्यातील योजना अंमल बजावणीबाबतचा आढावा घ्यावा.
३) योजने अंतर्गत सानुग्रह अनुदानाची रक्कम अदा करण्याबाबत लाभार्थी अथवा शासकीय यंत्रणा यामध्ये वाद निर्माण झाल्यास, त्याबाबत समाधानकारक तोडगा काढणे.
४) कागदपत्रांचे पुर्ततेसाठी प्रलंबित प्रकरणांबाबत आवश्यक कागदपत्र उपलब्ध करुन देणेबाबत संबंधित यंत्रणांस सुचना देणे.
५) अपघात झाल्याच्या दिनांकपासून विहित मुदतीच्या आत तालुका कृषि अधिकारी कार्यालयाकडे दाखल न झालेल्या प्रकरणी विलंबाची कारणे विचारात घेऊन कारणमिमांसा योग्य वाटल्यास अशा प्रस्तावांना मंजुरी देण्याबाबत अंतिम निर्णय घेणे.
६) सदर योजनेअंतर्गत लाभार्थ्यास आक्षेप / अपील घ्यावयाचे झाल्यास तालुका स्तरावरिल गठित समितीच्या निर्णयानंतर ६० दिवसात जिल्हा स्तरीय अपिलीय समितीकडे आक्षेप नोंदविणे आवश्यक राहिल.
७) तालुका स्तरावरील समितीने पाठविलेले, विलंबाने प्राप्त झालेले प्रस्ताव व अर्जदाराने अपील केलेल्या प्रकरणी अंतीम निर्णय घेणे.

१५.३) तालुका स्तरावरील समिती

योजनेच्या प्रभावी अंमबजावणीसाठी तालुका स्तरावर तहसिलदार यांचे अध्यक्षतेखाली पुढील प्रमाणे तालुका स्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) तहसीलदार | : | अध्यक्ष |
| २) गट विकास अधिकारी (पंचायत समिती) | : | सदस्य |
| ३) वरिष्ठ पोलीस निरिक्षक (पोलीस) | : | सदस्य |
| ४) जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा प्रतिनिधी | : | सदस्य |
| ५) सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचा प्रतिनिधी | : | सदस्य |
| ६) तालुका कृषि अधिकारी | : | सदस्य सचिव |

तालुका स्तरीय समितीची कार्ये:

१. योजने संबंधित प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करणे व प्रतिमाह बैठक घेणे
२. योजने अंतर्गत प्राप्त प्रस्तांवाची छाननी करुन प्राप्त प्रस्तांवाना मान्यता देणे
३. प्रस्तावातील कागद पत्रांच्या त्रृटीपुर्ततेसाठी संबंधित यंत्रणाना सुचना देणे.
४. आवश्यकतेनुसार तक्रारींची पडताळणी करुन जिल्हा स्तरीय समितीस शिफारस करणे.

१६) योजनेमध्ये समाविष्ठ असलेल्या विविध घटकांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या. :-

अ) अर्जदार :-

१. अपघात झाल्यानंतर त्वरित योजनेंतर्गत अपघाताच्या स्वरुपानुसार आवश्यक कागदपत्रांसह सविस्तर प्रस्ताव विहित नमुन्यात क्लेम फॉर्म भाग १ नुसार अपघात झाल्याच्या दिवसापासून ३० दिवसाच्या आत संबंधित तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सादर करणे बंधनकारक राहिल.

**(ब) महसूल यंत्रणा :-**

१) तलाठी : - अपघात ग्रस्त शेतकरी /वारसदार/ संबंधित कृषी पर्यवेक्षक यांना ७/१२ चा उतारा, गाव नमुना ६- क तातडीने उपलब्ध करून द्यावे.

२) तहसीलदार :

१. अर्जदारास लागणारे ७/१२, यांचे उतारे, वारस नोंद व तलाठी प्रमाणपत्र अर्जदारास तातडीने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना संबंधितांना निर्गमित कराव्यात.

२. प्रत्येक महिन्यात किमान एकदा प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन महसूल विभागाकडील कागदपत्रांच्या अभावी कोणतेही प्रकरण प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

३) जिल्हाधिकारी :

१. जिल्हा अपिलीय समितीचे अध्यक्ष या नात्याने जिल्हाधिकारी यांनी प्रभावी योजना अंमलबजावणीच्या अनुषंगाने प्रत्येक तीन महिन्यात जिल्हयाचा आढावा घ्यावा व अडचणींचे निराकरण करावे.

२. योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणेचे दृष्टीने सुधारणा/ सूचना याबाबत आयुक्त (कृषी) यांना अवगत करावे.

**(क) कृषी विभाग :-**

१) कृषी पर्यवेक्षक :

१. सदर योजनेचे प्रयोजनार्थ क्षेत्रीय स्तरावरील सर्व कृषी पर्यवेक्षक यांना दावा /प्रस्ताव सादरकर्ता प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२. तालुक्यातील मंडळ कृषी अधिकारी यांचे अधिनस्त क्षेत्रीय काम करणारे कृषी पर्यवेक्षक यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील दुर्घटने संदर्भात माहिती मिळताच संबंधित दुर्घटनाग्रस्त शेतकरी व मृत शेतकऱ्यांचे वारसदार यांचेशी संपर्क साधावा व अर्जाच्या विहित नमुन्यात माहिती शेतकऱ्यांकडून संकलित करण्यासाठी व संबंधित शासकीय यंत्रणांशी समन्वय ठेवून कागदपत्रे उपलब्धतेबाबत शेतकरी कुटुंबास मदत करावी.

३. अर्ज स्वीकारते वेळी प्रस्तावासोबत ७/१२, गाव नमुना ६- क, हे मूळ प्रतीत व तपासणीसुची नुसार उर्वरित निर्धारित केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे स्वयंसाक्षांकीत केली असल्याची खात्री करावी व नसल्यास अपुर्ण कागपत्रांची पूर्तता करून घेऊन अर्ज स्वीकारावा. अपूर्ण अर्जामधील त्रुटि बाबत तशी नोंद घेऊन संबंधित शेतकरी/वारसदारला कळविण्यात यावे व त्रुटींच्या पुर्ततेसाठी पाठपुरावा करावा.

४. अपवादात्मक परिस्थितीमध्ये एखादे कागदपत्राअभावी प्रस्ताव परिपूर्ण होत नसल्यास प्रस्ताव दाखल करून घेऊन, या संदर्भात पर्यायी कागदपत्रांची पूर्तता करून घेण्यास सहकार्य करावे.

**२) मंडळ कृषि अधिकारी**

१. कृषी पर्यवेक्षक यांनी सादर केलेला अर्ज स्वीकारावा व अर्ज स्वीकारताना प्रस्तावासोबत ७/१२, गाव नमुना ६- क मुळप्रतीत व तपासणीसुची नुसार उर्वरित कागदपत्रे स्वयंसाक्षांकीत केलेली असल्याची खात्री करावी, नसल्यास अपुर्ण कागदपत्रांची पूर्तता करून घेऊन अर्ज स्वीकारावा व पोहोच द्यावी.

२. प्राप्त दावे मार्गदर्शक सुचनेप्रमाणे मंडळ कृषि अधिकारी यांनी छाननी करुन परिपुर्ण प्रस्ताव तपासणी सुचीसह तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालयात सादर करून रीतसर पोहोच घ्यावी. तसेच अपुर्ण प्रस्तावाबाबत काही कागदपत्रांची त्रृटी असल्यास संबंधित लाभार्थ्यास आपल्यास्तरावरुन अवगत करण्यात यावे व त्रुटींच्या पुर्ततेसाठी पाठपुरावा करावा.

**३) तालुका कृषी अधिकारी :**

१. योजनेची प्रसिद्धी करावी.

२. योजनेसंबंधी माहिती /अर्जाचा नमुना पुरवावा.

३. कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रस्तावांची संगणक प्रणालीमध्ये नोंद करणे.

४. मंडळ कृषि अधिकारी या कार्यालयाकडून प्राप्त झालेले परिपुर्ण प्रस्ताव मार्गदर्शक सुचनेप्रमाणे छाननी करुन मंजुर प्रस्ताव, नामंजुर प्रस्ताव कारणासहित व कागदपत्रांअभावी अपुर्ण प्रस्ताव या वर्गवारीनुसार संबंधित तहसिलदार यांचेकडे सादर करावेत.

५. तहसिलदार यांचे अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार तालुका कृषि अधिकारी व तहसिलदार यांचे सयुंक्त स्वाक्षरीसह संबंधित अर्जदार व वारसदारास प्रस्ताव मंजुर, नामंजुर अथवा कागदपत्राच्या अभावी अपुर्ण असल्याचे कळवावे. (सोबत विहित नमुने)

६. योजनेचा नियमीतपणे आढावा घेणे व त्रुटीपुर्ततेसाठी पाठपुरावा करणे.

७. तालुका स्तरावर सोबत दिलेल्या विहित नमुन्यात लाभार्थीनिहाय प्रस्तावांच्या अदयावत नोंदी नोंदवहित ठेवाव्यात.

८. विहित कागदपत्रांचे त्रुटींमुळे परत आलेल्या प्रकरणातील त्रुटींची पूर्तता करून घेऊन परिपूर्ण प्रस्ताव फेरसादर करावा.

९. दावा नामंजूरी संदर्भात विवाद निर्माण झाल्यास जिल्हा अपिलीय समितीकडे तक्रार दाखल करण्यास संबंधितांना मार्गदर्शन करावे.

१०. शासनाने मंजूर केलेल्या प्रस्तावाचे सानुग्रह अनुदान रक्कम संबंधित शेतकऱ्याचे /वारसदारांचे बँक खात्यात जमा झाले बाबत खातरजमा करावी.

**४) उपविभागीय कृषी अधिकारी:**

१. योजनेची प्रसिद्धी करावी.

२. योजनेसंबंधी माहिती /अर्जाचा नमुना पुरवावा.

३. तालुकास्तरीय समितीने मंजुर केलेले प्रस्ताव व त्यासंबंधिची लाभार्थीनिहाय निधी मागणी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करण्यात यावी.

४. योजनेचा नियमीतपणे प्रतिमहा आढावा घेणे.

५. योजनेअंतर्गत आर्थिक वर्षात तालुकानिहाय प्राप्त होणाऱ्या एकूण प्रस्तावांच्या १० टक्के प्रस्तावांची तपासणी योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार दरवर्षी करण्यात येऊन तपासणी अहवाल संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करावा. (सोबत तपासणी अहवाल नमुना)

**५) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी :**

१. योजनेची प्रसिध्दी करावी.

२. योजना अंमलबजावणीच्या अनुषंगाने प्रतिमहा तालुकानिहाय आढावा घेण्यात यावा.

३. योजनेमधील पात्र लाभार्थ्यासाठी जिल्हयांकरिता लागणारा लाभार्थीनिहाय निधीची मागणी कृषि आयुक्तालयाकडे सादर करण्यात यावी.

४. मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा अपिलिय समितीचे सदस्य सचिव म्हणून तिमाही आढावा बैठक आयोजित करून योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.

५. जिल्ह्यात योजनेची यशस्वी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांची राहील.

६. अर्जदार अपिलात गेलेल्या लाभार्थीनिहाय प्रस्तावांच्या अदयावत नोंदी जिल्हा स्तरावर सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील नोंदवहित ठेवाव्यात.

७. योजनेअंतर्गत आर्थिक वर्षात जिल्ह्यामध्ये प्राप्त होणाऱ्या एकूण प्रस्तावांच्या २ टक्के प्रस्तावांची तपासणी योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार दरवर्षी करण्यात येऊन तपासणी अहवाल संबंधित विभागीय कृषि सह संचालक यांना सादर करावा. (सोबत तपासणी अहवाल नमुना)

८. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयतील लेखाधिकारी यांनी आर्थिक वर्षाअखेरीस तालुकानिहाय नियमित लेखा परिक्षणाची कार्यवाही करुन लेखा परिक्षणाचा अहवाल संबंधित विभागीय कृषि सह संचालक यांना सादर करावा.

९. न्यायालयीन प्रकरणी दाव्यांचे कामकाज पाहण्यासाठी शासनाचे वतीने संपूर्ण कार्यवाही करणेसाठी "सक्षम प्राधिकारी" म्हणून, तसेच जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच येथे दाखल केल्या जाणा-या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच येथे कॅव्हेट दाखल करणेसाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**६) विभागीय कृषी सहसंचालक :**

१. विभागातील योजनेची यशस्वीरीत्या अंमलबजावणी करण्याची संपूर्ण जबाबदारी विभागीय कृषी सहसंचालक यांची राहील.

२. संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे समवेत दरमहा आढावा बैठक घेऊन योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी संनियंत्रण करावे.

३. योजनेचा जिल्हानिहाय मासिक प्रगती अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करण्यात यावा. (सोबत मासिक प्रगती अहवाल नमुना )

४. योजनेअंतर्गत आर्थिक वर्षात विभागामध्ये प्राप्त होणाऱ्या एकूण प्रस्तावांच्या १ टक्के प्रस्तावांची तपासणी योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार दरवर्षी करण्यात येऊन तपासणी अहवाल संबंधित विभागीय कृषि सह संचालक यांना सादर करावा. (सोबत तपासणी अहवाल नमुना)

५. विभागीय कृषि सह संचालक कार्यालयतील लेखाधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील संबंधित जिल्ह्यांनी आर्थिक वर्ष अखेरीस केलेला लेखा परिक्षण अहवाल तपासून अभिप्रायासह कृषि आयुक्तालयास नियमितपणे सादर करावा.

७) कृषी आयुक्तालय:

१. आयुक्त (कृषी) यांनी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व विभागीय कृषी सहसंचालक यांचेकडून योजनेचा मासिक प्रगती अहवाल घेऊन योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी सनियंत्रण करावे व योजनेच्या प्रगतीबाबत शासनास वेळोवेळी अवगत करावे.

२. योजनेच्या कालावधीत आयुक्त (कृषी) यांनी योजनेच्या प्रगतीचा आढावा घ्यावा. सदर आढावा घेताना जिल्हानिहाय दाखल झालेले प्रस्ताव, त्यापैकी मंजूर केलेले प्रस्ताव, नामंजूर केलेले प्रस्ताव, कागदपत्रांअभावी प्रलंबित असलेले प्रस्ताव, योजना अंमलबजावणीतील अडचणी व त्यावरील उपाय योजना, योजनेच्या प्रसिद्धीसाठी तसेच प्रस्ताव निकाली काढण्यासाठी आखलेली मोहीम, अथवा विशेष प्रयत्न इत्यादी गोष्टी विचारात घ्याव्यात.

३. सदर योजनेसाठी आवश्यक असणाऱ्या निधीची मागणी शासनाकडे करणे, निधी उपलब्ध करुन घेणे, निधीचे वितरण करणे. याबाबत सनियंत्रण करावे.

१७) आकस्मिक खर्च :-

या योजने अंतर्गत प्राप्त निधीमधून ३ टक्के रक्कम प्रशासकिय खर्चासह आवश्यकतेनुसार वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासननिर्णयानुसार बाह्यस्थ संस्थेव्दारे घ्यावयाच्या मनुष्यबळाच्या खर्चासाठी असेल.

१८) न्यायालयीन क्षेत्र (Judicial Jurisdiction) –

ग्राहक मंचाचे कार्यक्षेत्र - संबंधित जिल्ह्याचे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच (District Consumer Redressal Forum) हे त्या जिल्ह्यातील न्यायालयीन क्षेत्र (Jurisdiction) राहील.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेचे कल्याणकारी स्वरूप विचारात घेता व सदर योजना शासनाच्या प्रशासकिय यंत्रणेमार्फत राबविण्यात येत असल्याने कोणत्याही न्यायालयीन प्रकरणी शासनास प्रतिवादी करता येणार नाही. तसेच शासनावर नुकसान भरपाई दायित्व निश्चित करता येणार नाही. तसेच योजना राबविताना उचित हेतूने केलेल्या कार्यवाही बाबत शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांवर नुकसान भरपाईचे आर्थिक दायित्व असणार नाही.

१९) गैर प्रकरणात कारवाई करणे :-

चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे प्रस्ताव करणे, अशा बाबी पुराव्यानिशी निदर्शनास आल्यास, अशा प्रकरणात संबंधित दोषींवर जिल्हा अपिलीय समितीच्या मार्गदर्शनानुसार आवश्यक कारवाई दाखल करण्याची जबाबदारी संबंधित तहसिलदार यांची राहील. तसेच महसुल दस्तऐवजामध्ये फेरफार करून योजनेत सहभागी झालयाचे निदर्शनास आल्यास महसुल दस्तऐवजामधे चुकिचे फेरफाराबद्दल महसुल विभागामार्फत तहसिलदार यांनी स्वतंत्रपणे गुन्हे दाखल करणे बाबत कार्यवाही करावी.

२०) राज्यस्तरावर सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आयुक्त (कृषि) हे सनियंत्रण व पर्यवेक्षण करतील.

२१) सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी योजनेमध्ये समाविष्ठ नसलेल्या बाबी व अन्य आवश्यकतेनुसार सुचना आयुक्त कृषि निर्गमित करतील.

२२) सदर योजनेमध्ये कोणत्याही प्रकारचे बदल / सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२३) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना आवश्यकतेनुसार प्रथम ३ वर्षे राबविण्यात येऊन तद्नंतर सदर योजनेचे मुल्यमापन करुन योजना पुढे सुरु ठेवायची कि विमा योजना राबवावी याचा निर्णय घेण्यात येईल.

२४) योजनेचा खर्च खालील नमूद लेखाशिर्षाखाली सन २०२३-२४ करिता मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

मागणी क्र. डी. ३
२४०१ - पीक संवर्धन,
११० - पीक विमा,
(००) (०६) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना
(कार्यक्रम) (२४०१ ४४२७)
३३ - अर्थसहाय्य

सुनील चव्हाण (भाप्रसे)
आयुक्त कृषि
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रति,

१) मा. प्रधान सचिव, कृषि व फलोत्पादन विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-३२
२) मा. अवर सचिव, कृषि विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-३२
३) मा. विभागीय आयुक्त, सर्व
४) मा. जिल्हाधिकारी, सर्व
५) कृषि संचालक कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ( सर्व )
६) विभागीय कृषि सह संचालक (सर्व)
७) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व)
८) जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व)
९) तहसीलदार, (सर्व)
१०) उपविभागीय कृषि अधिकारी, (सर्व)
११) तालुका कृषि अधिकारी, (सर्व)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
कृषि विभाग

## :: गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना ::
## सन-२०२३-२४

# प्रस्ताव मुखपृष्ठ

| | | |
|---|---|---|
| १ | अपघातग्रस्त शेतकऱ्याचे संपुर्ण नाव | |
| २ | संपुर्ण पत्ता, (पत्रव्यवहारासाठी) | |
| ३ | अपघात दिनांक | |
| ४ | मृत्यु दिनांक | |
| ५ | अपघातग्रस्ताचे वय | |
| ६ | अपघाताचा प्रकार (मृत्यु/ अपंगत्व) | |
| ७ | अपघाताचे कारण | |
| ८ | अर्जदाराचे / वारसदाराचे नाव :- | |
| ९ | अर्जदाराचे अपघातग्रस्त व्यक्तीशी नाते | |
| १० | वारसदार संपर्क क्रमांक | |
| ११ | कृषि पर्यवेक्षकाचे नाव व कार्यक्षेत्र | |

**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना**

**क्लेम फॉर्म भाग – १**

(सविस्तर प्रस्ताव)

प्रति

तालुका कृषि अधिकारी

तालुका ................ जिल्हा................

विषय :- **गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना अंतर्गत सविस्तर प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**महोदय,**

मी **श्री/श्रीमती** ......................................................................रा................................ ता.................................. जिल्हा..................... **सोबत जोडलेल्या** तपासणीसूची मध्ये नमूद केलेली आवश्यक कागदपत्रे यासह सानुग्रह अनुदान मिळण्याकरिता सविस्तर प्रस्ताव सादर करित आहे.

**सोबत :-** १) प्रपत्र- अ मधील अपघाताचे अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे

२) साक्षांकित तपासणी सुची

**अर्जदाराचे** नांव व **स्वाक्षरी**

ठिकाण :

दिनांक :

# स्वयं : घोषणापत्र

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना

## स्वयंसाक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र

## नमुना - अ

| अर्जदार फोटो |
|---|

मी खाली सही करणार............................................................ रा............................ तालुका ........................जिल्हा............................ वय .........................वर्षे, आधार क्रमांक (असल्यास) ..............................व्यवसाय................. याव्दारे घोषित करतो/करते की, श्री / श्रीमती............... .......................................हे दिनांक / / रोजी गांव ....................... ता................ जि....................... येथे अपघाताने अपंग/मयत झाले आहेत. त्यांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेचा लाभ मिळावा म्हणुन मी अर्ज केलेला असून अर्जासोबत जोडलेल्या स्वयंसाक्षांकित केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्यप्रती आहेत. त्या खोट्या असल्याचे आढळून आल्यास भारतीय दंड सहिता आणि / किंवा संबधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची सही ..............................

अर्जदाराचे नांव ................................

# तपासणी सुची

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना

| अ.क्र. | आवश्यक कागदपत्रे | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | अपघातग्रस्त शेतक-याचे नांव | | |
| २ | गांव | | |
| ३ | तालुका | | |
| ४ | जिल्हा | | |
| ५ | अपघात झाल्याचा दिनांक | | |
| ६ | अपघातग्रस्ताचा मृत्यू दिनांक | | |
| ७ | अपघातग्रस्ताचे वय १० ते ७५ वयोमर्यादेतच असावे. जन्मदिनांक व वय | | |
| ८ | अपघातामुळे बाधित प्रकार, (मृत्यू/अपंगत्व) | | |
| ९ | अपघाताच्या घटनेचे स्वरुप (रस्ता अपघात/विजेचा धक्का/विषबाधा खुन इ.) | | |
| १० | वारसदाराचे नाव व संपर्क क्रमांक | | |
| ११ | वारसदाराचे अपघातग्रस्ताशी नाते | | |
| १२ | वारसदाराचे ओळखपत्र : आधारकार्ड/बँकपासबुक/पॅनकार्ड/निवडणुक आयडी | | |
| १३ | मार्गदर्शक सुचनाप्रमाणे प्राथम्य क्रमानुसार वारसदार बरोबर आहे का. नसल्यास इतर वारसदारांचे नाहरकत प्रमाणपत्र जोडले आहे काय ? | | |
| १४ | अपघातग्रस्त व्यक्तीचा ७/१२<br>अ) अपघातग्रस्त व्यक्ति ७/१२ धारक आहे का. (होय/नाही)<br>ब) असल्यास ७/१२ जोडलेला आहे काय (होय/नाही)<br>क) अपघातग्रस्त व्यक्ति कुंटूबातील इतर सदस्य आहे काय (होय/नाही) | | |
| १५ | सहा (६) क आहे काय ? | | |
| १६ | मृत्यू दाखला / अपंगत्वाचा दाखला | | |
| १७ | एफआयआर इ. खबरी जबाब | | |
| १८ | घटनास्थळ पंचनामा | | |
| १९ | पोलिस पाटील माहिती अहवाल | | |
| २० | इन्क्वेस्ट (मरणोत्तर) पंचनामा | | |
| २१ | पोस्टमार्टम रिपोर्ट | | |
| २२ | वैध वाहन परवाना आवश्यक असल्यास. | | |
| २३ | अपंगत्व आलेले असल्यास प्रमाणपत्र व फोटो. | | |
| २४ | शिधापत्रिका (रेशनकार्ड) | | |
| २५ | अर्जदाराचे स्वयंघोषणापत्र आहे काय (नमुना-अ) | | |
| २६ | सर्व कागदपत्र पुर्ण असल्यास लाभ देण्यासाठी पात्र आहे काय ? असल्यास द्यावयाची लाभाची रक्कम रुपये. | | |
| २७ | कागदपत्र अपूर्ण असल्यास त्याची यादी, | | |
| २८ | इतर कागदपत्रे, बँक पासबुक झेरॉक्स | | |

वरिल तपासणीसूची प्रमाणे माहिती अचूक भरण्यात यावी व ती साक्षंकित करुन सादर करण्यात यावी

| | | |
|---|---|---|
| नांव व स्वाक्षरी | नांव व स्वाक्षरी | नांव व स्वाक्षरी |
| अर्जदार | मंडळ कृषि अधिकारी, | तालुका कृषि अधिकारी, |
| गांव | मंडळ : | तालुका : |

# गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना सन २०२३-२४

## प्रस्ताव मंजुर पत्र नमुना

जा.क्र. गोमुंशेसाअयो/ २० ...........                                        दिनांक....../........./...........

प्रति

श्री/श्रीमती ................................

**विषय :** गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना सन २०२३-२४ अंतर्गत प्राप्त प्रस्ताव मंजुर केलेबाबत.

**संदर्भ :** तालुका स्तरीय समिती बैठकीचे इतिवृत्त दिनांक:    /    /२०२३

**महोदय,**

वरिल विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, मयत/ अपंग शेतकऱ्याचे नांव श्री................................ गांव................ तालुका.............. जिल्हा.................. वारसदाराचे नाव श्री................................गांव................ तालुका.............. जिल्हा................. यांचा प्रस्ताव उपरोक्त नमूद संदर्भान्वये मंजूर करण्यात आलेला आहे. सानुग्रह अनुदानाची रक्कम खालील प्रमाणे प्राप्त कर्त्याच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल या बाबतची नोंद घेण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १ | अपघातग्रस्त शेतकऱ्याचे नांव | |
| २ | अपघात दिनांक | |
| ३ | अपघात प्रकार (मृत्यू/अपंग) | |
| ४ | तालुका कृषि अधिकारी कार्यालयास प्रस्ताव प्राप्त झाल्याचा दिनांक | |
| ५ | त्रृटी पुर्ततेनंतर अंतिम कागदपत्र प्राप्त झाल्याची तारीख | |
| ६ | तालुका स्तरीय समितीने प्रस्ताव मंजुर केल्याचा दिनांक | |
| ७ | सानुग्रह अनुदानाची रक्कम (अंकी) | |
| ८ | सानुग्रह अनुदानाची रक्कम (अक्षरी) | |
| ९ | वारसदाराचे नांव | |
| १० | वारसदाराच्या बँकेचे नांव व शाखा | |
| ११ | वारसदाराचे बँक खाते क्रमांक | |

तालुका कृषि अधिकारी,
सदस्य सचिव
तालुका स्तरीय समिती
नाव, सही व शिक्का

तहसिलदार
अध्यक्ष
तालुका स्तरीय समिती
नाव, सही व शिक्का

प्रत

१) विभागीय कृषि सह संचालक ..........
२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी......
३) उपविभागीय कृषि अधिकारी........

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना सन २०२३-२४
## प्रस्ताव नामंजुर पत्र नमुना

जा.क्र. गोमुंशेसाअयो/ २० ........... दिनांक....../........./...........

प्रति

श्री/श्रीमती ..................................

**विषय :** गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना सन २०२३-२४ अंतर्गत प्राप्त प्रस्ताव नामंजुर केलेबाबत.

**संदर्भ :** तालुका स्तरीय समिती बैठकीचे इतिवृत्त दिनांक: / /२०२३

महोदय,

वरिल विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, मयत/ अपंग शेतकऱ्याचे नांव श्री...................................... गांव................ तालुका ................... जिल्हा ........................ वारसदाराचे नाव श्री............................................... गांव ........................ तालुका ....................... जिल्हा ........................ यांचा प्रस्ताव उपरोक्त नमूद संदर्भान्वये खालील नमूद कारणास्तव नामंजुर करण्यात येत आहे याची कृपया नोंद घ्यावी.

योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार प्रस्ताव अपात्र ठरविण्याचे कारण . ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------------------

योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार खालील बाबींकरिता सानुग्रह अनुदान लागू नाही.

१) नैसर्गिक मृत्यू
२) विमा कालावधीपुर्वीचे अपंगत्व
३) आत्महत्येचा प्रयत्न, आत्महत्या किंवा जाणीवपूर्वक स्वत:ला जखमी करुन घेणे
४) गुन्हयाच्या उद्देशाने कायद्याचे उल्लंघन करतांना झालेला अपघात
५) अंमली पदार्थाच्या अमलाखाली असतांना झालेला अपघात
६) भ्रमिष्टपणा
७) शरीरातर्गत रक्तस्त्राव
८) मोटार शर्यतीतील अपघात
९) युध्द
१०) सैन्यातील नोकरी
११) जवळच्या लाभधारकाकडून खून.

तालुका कृषि अधिकारी,
सदस्य सचिव
तालुका स्तरीय समिती
नाव, सही व शिक्का

तहसिलदार
अध्यक्ष
तालुका स्तरीय समिती
नाव, सही व शिक्का

प्रत

१) विभागीय कृषि सह संचालक ..........
२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ...........
३) उपविभागीय कृषि अधिकारी........

**(टिप : तालुका स्तरीय समितीचा निर्णय अर्जदारास अमान्य असल्यास समितीच्या निर्णयानंतर ६० दिवसात जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अपिलीय समितीकडे आक्षेप नोंदविणे आवश्यक राहिल.)**

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजना सन २०२३-२४

### प्रस्तावातील त्रृटी संदर्भात पत्र

जा.क्र. गोमुंशेसाअयो/ २० ...........                                    दिनांक....../........./...........

प्रति

श्री/श्रीमती .................................

**विषय : गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजना सन २०२३-२४ अंतर्गत प्राप्त प्रस्तावातील त्रृटी/ अपुर्ण कागदपत्र असलेबाबत कळविणे.**

**संदर्भ :** तालुका स्तरीय समिती बैठकीचे इतिवृत्त दिनांक:    /    /२०२३

महोदय ,

वरिल विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त नमूद संदर्भान्वये मयत/अपंग शेतकऱ्याचे नाव श्री.................................. गाव............. तालुका...........जिल्हा......... तसेच वारसदाराचे नाव श्री.......................... गाव .............. तालुका........... जिल्हा.......... यांचा प्रस्ताव या कार्यालयास दिनांक ..... /...... /२०    रोजी प्राप्त झाला असून सदर प्रस्तावाची छाननी केली असता त्यामध्ये खालील त्रृटी आढळून आलेल्या आहेत. तरी त्रृटींची पुर्तता लवकरात लवकर करुन प्रस्ताव फेर सादर करण्यात यावा.

योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार प्रस्तावामध्ये पुढीलप्रमाणे आढळून आलेल्या त्रृटीची पुर्तता करणेबाबत -

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

| | |
|---|---|
| तालुका कृषि अधिकारी, | तहसिलदार |
| सदस्य सचिव | अध्यक्ष |
| तालुका स्तरीय समिती | तालुका स्तरीय समिती |
| नाव, सही व शिक्का | नाव, सही व शिक्का |

प्रत

१) विभागीय कृषि सह संचालक ..........

२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी .........

३) **उपविभागीय कृषि अधिकारी ........**

## तालुकास्तरावर ठेवावयाच्या नोंदवहीचा नमुना

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना सन २०२३-२४

तालुका -

| अ.क्र. | अपघातग्रस्त शेतकऱ्याचे नांव | गांव | तालुका | अपघात दिनांक | वारस दाराचे नांव | वारसदाराचे अपघातग्रस्ताशी नाते | वारसदाराचा संपर्क क्रमांक | अपघाताचे स्वरुप मृत्यू/अपंगत्व |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |

| अ.क्र. | तालुका कृषि अधिकारी कार्यालयास प्रस्ताव प्राप्त झाल्याचा दिनांक | तालुका स्तरीय समितीने प्रस्ताव मंजुर केल्याचा दिनांक | तालुका स्तरीय समितीने प्रस्ताव नामंजुर केल्याचा दिनांक व कारण | तालुका स्तरीय समितीने प्रस्तावाच्या अनुषंगाने त्रृटी कळविल्याचा दिनांक व तपशील | अर्जदाराने त्रृटींची पुर्तता करुन प्रस्ताव फेर सादर केल्याचा दिनांक | त्रृटींची पुर्तता केल्यानंतर तालुका स्तरीय समितीने प्रस्ताव मंजुर केल्याचा दिनांक | अर्जदाराने जिल्हा स्तरीय समितीकडे अपील केल्यास त्याचा तपशील (दिनांक व निर्णय) | शेरा / अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| १ | | | | | | | | |
| २ | | | | | | | | |

( टिप : जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी अपील झालेल्या प्रकरणांची वरिल नमुन्याप्रमाणे कार्यलयीन स्तरावर नोंदवही ठेवण्यात यावी)

# गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजना सन २०२३-२४

## मासिक प्रगती अहवाल नमुना .

**माहे :**

| अ. क्र. | तालुका नांव | महिन्या मध्ये प्राप्त झालेले एकूण प्रस्ताव संख्या | तालुका स्तरीय समितीच्या बैठकित घेतलेल्या निर्णयानुसार | | | | | जिल्हा स्तरीय अपीलीय समिती अपील झालेले प्रस्ताव संख्या | जिल्हा स्तरीय अपीलीय समितीने अपील झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दिलेला निर्णय | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मंजूर प्रस्ताव संख्या | | | नामंजूर प्रस्ताव संख्या | कागदपत्रां अभावी अपुर्ण प्रस्ताव संख्या | | मंजूर प्रस्ताव संख्या | | | नामंजूर प्रस्ताव संख्या भौतिक (संख्या) | एकूण मंजूर प्रस्ताव संख्या | | | एकूण नामंजूर प्रस्ताव संख्या |
| | | | भौतिक (संख्या) | | आर्थिक (रु.लाख) | | | | भौतिक (संख्या) | | आर्थिक (रु.लाख) | | भौतिक (संख्या) | | आर्थिक (रु.लाख) | |
| | | | मृत्यू | अपंगत्व | | | | | मृत्यू | अपंगत्व | | | मृत्यू | अपंगत्व | | |
| १ | २ | ३ | ४ | | | ५ | ६ | ७ | ८ | | | ९ | १० = ४+८ | | | ११=५-९ |
| | | | | | | | | | | | | | | | | |

स्थळ :

दिनांक :

तालुका कृषि अधिकारी

नाव, सही व शिक्का

( टिप : उपविभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, व विभागीय कृषि सहसंचालक यांचे कार्यालयीन स्तरावर सदर विहित नमुन्यात मासिक प्रगती अहवाल तयार करण्यात यावे.)

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजना सन २०२३-२४

प्रस्ताव तपासणी करणेबाबतचा नमुना .

| अ. क्र. | तालुका नांव | सन २०२३-२४ मध्ये योजने अंतर्गत एकूण प्राप्त प्रस्ताव संख्या | मंजूर प्रस्ताव संख्या | नामंजूर प्रस्ताव संख्या | कागदपत्रां अभावी अपुर्ण असलेले प्रस्ताव संख्या | उप विभागीय कृषि अधिकारी कार्यालयाने मार्गदर्शक सुचनेप्रमाणे प्रस्ताव तपासणी करावयाची संख्या (१०/२/१ टक्के) प्रमाणे | तपासणी सुची प्रमाणे प्रस्ताव योग्य/अयोग्य असल्याबाबतचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

सुचना : योजनेअंतर्गत आर्थिक वर्षात प्राप्त होणाऱ्या एकूण प्रस्तावांच्या १० टक्के प्रस्तावांची तपासणी उपविभागीय कृषि अधिकारी, २ टक्के प्रस्तावांची तपासणी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व १ टक्के प्रस्तावांची तपासणी विभागीय कृषि सह संचालक यांनी वरिल नमुन्याप्रमाणे शासन निर्णय व मार्गदर्शक सुचनेनुसार करावयाची असून तपासणी अहवाल सादर करावयाचा आहे.

स्थळ :

दिनांक :

उप विभागीय कृषि अधिकारी

नाव, सही व शिक्का

( टिप : जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, व विभागीय कृषि सहसंचालक यांचे कार्यालयीन स्तरावर सदर विहित नमुन्यात प्रस्ताव तपासणी अहवाल तयार करण्यात यावे.)